# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६५ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर परिसरात गणेशोस्तव सण साजरा होणार आहे. गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि.०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत आयडिया कपंनीचे बाजुस उल्हास नदी जवळ विसर्जन तलावाकडे शहाड उड्डाणपुला खालुन ३.५ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त अशा गणेशमुर्तीचे वाहने जाऊ शकत नसल्याने. सदर मार्गावरून गणेशमुर्तींना कोणतीही हानी होवू नये. तसेच सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद–** १) ज्या गणेशमुर्तीची उंची ३.५ मीटर पेक्षा जास्त आहे. अशा गणेशमुर्तीचे वाहनांना शहाड उड्डाणपुलाचे खालुन जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** ज्या गणेशमुर्तीची उंची ३.५ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा गणेशमुर्तीचे वाहनांना उलट दिशेने कटकेश्वर मंदीर मार्गे शहाड जकात नाका येथे येवुन डावीकडे वळुन नवनिर्मित गणेशमुर्ती विसर्जन घाट येथे जातील.

दिवशी दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि.०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली व उल्हासनगर म.न.पा.

**प्रत कार्यवाहीसाठी:–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे
प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– [illegible]

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

सपोआ वाहतूक विभाग उल्हासनगर व कल्याण, पोनि. उल्हासनगर /विठठलवाडी/कल्याण वाहतूक उपविभाग.
२/— उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner